# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

श्री हरीलाल भगवती स. सा. रुग्णालय, बोरीवली. मुंबई ४००१०३

एचओ/1458/बीएच (एनटीसी) दि.09.07.2026

## <u>शुध्दीपत्रक</u>

महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या परिप्रत्रक क्र. मराशूवपशिमं/प्रवेश प्रक्रिया/१५४८/२०२६ दि.०७/०७/२०२६ अन्वये GNM नर्सिंग २०२६- २०२७ ची प्रवेश प्रक्रिया तूर्तास थांबवण्यात आली आहे, तरी पुढील आदेश प्राप्त होई पर्यन्त WWW.MCGMPORTAL.GOV.IN या संकेतस्थळावर नियमित भेट द्यावी.

सही/-

प्रमुख वैद्यकीय अधिकारी

श्री. हरिलाल भगवती रुग्णालय, बोरीवली (प.)

# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार,
पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, ४th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort,
Mumbai-४०० ००१ Website:www.msbnpe.orgE-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५


क्र. मराशुवपशिमं/प्रवेश प्रकीया/ १५४८ /२०२६ दि.०७/०७/२०२६

## परिपत्रक

प्रति,
सर्व संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. परिचर्या प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय - परिचर्या पदविका अभ्यासक्रमाच्या ए.एन.एम व जी.एन.एम महाविद्यालयातील नवीन विद्यार्थाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत.

संदर्भ - १) क्रमांक : सीईटी-२०२५/प्र.क्र.१६५ (ई-१०९८२१५)/शिक्षण-१, दिनांक: २९.६.२०२६

२) शासन निर्णय क्रमांक: सीईटी-२०२५/प्र.क्र.१६५ (ई-१०९८२१५)/शिक्षण-१, दि. ३०/०६/२०२६.

३) मंडळाचे पत्र क्र.मराशुवपशिमं/एएनएम-जीएनएम/प्रवेश/(CAP)/१५०८/२०२६, दि.०२/०७/२०२६.

४) महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष, मुंबई यांचे पत्र क्र.वैशिप्र-१०२६/प्र.क्र.७६/anm-gnm/प्रवेश प्रक्रिया/२०२६-२७/१५८४, दि.०२/०७/२०२६.

५) क्र. मराशुवपशिमं/प्रवेशप्रकीया/१५१९/२०२६, दि.०३/०७/२०२६.

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भ क्र.१ च्या मंडळास प्राप्त पत्रात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील व महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळाशी संलग्नीत महाविद्यालयांतील **ए.एन.एम व जी. एन. एम. या परिचर्या पदविका अभ्यासक्रमांसाठीचे शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ साठीचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या माध्यमातून केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP)** बारावीतील गुणांच्या आधारे करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे कळविले आहे.

त्यास अनुसरुन मंडळामार्फत महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (सीईटी) कक्ष, मुंबई यांस ए.एन.एम. व जी. एन. एम. या परिचर्या पदविका अभ्यासक्रमांसाठीचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीचे प्रवेश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या माध्यमातून केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) राबविण्यात येणार असल्यामुळे मंडळाशी संलग्नीत सर्व ए.एन.एम. व जी.एन.एम. परिचर्या प्रशिक्षण संस्था यांनी शै.व. २०२६-२७ करीता मंडळाच्या पुढील आदेशापर्यंत संस्थास्तरावर विद्यार्थी प्रवेशीत करुन नयेत.

शासनामार्फत प्राप्त होणा-या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ प्रवेश प्रक्रिया राज्य सीईटी कक्षामार्फत राबविण्याकरीता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक शासन मान्य प्रवेश माहिती पुस्तिका व इतर अनुषंगीक माहिती वेळोवेळी मंडळाच्या www.msbnpe.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, याची सर्व प्राचार्य/संस्थाप्रमुख यांनी नोंद घेण्यात यावी.

डॉ.जितेंद्र संकपाळ

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ